# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थपित राज्य विद्यापीठ)

*(आस्थापना विभाग)*

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२१६५९२

क्र. गो.वि/आस्था/2353/२०१५ दि. : 23 /११/२०१५

## परिपत्रक

**विषय**:– दि. २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" साजरा करण्याबाबत.
**संदर्भ**:– शासन पत्र क्रं.संकीर्ण–१११९/(प्र.क्र.१५१/१५)/समन्वय, दि. ०७/११/२०१५.

संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, संदर्भिय शासन पत्रा नुसार राज्यामध्ये संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व जनतेला संविधानाची ओळख व्हावी या दृष्टीने दि. २६ नोव्हेंबर २०१५ हा दिवस **"संविधान दिवस"** म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात यावा. तसेच शासन निर्णय दि. २४/११/२००८ मधिल तरतुदीनुसार आपल्या स्तरावर कार्यवाही घेण्यात यावी. करिता योग्य कार्यवाहीस्तव व माहितीस सादर.

**सहपत्र संलग्नः–**
१.शासनाचे संदर्भिय पत्र.
२.शासन निर्णय

कुलसचिव(प्रभारी)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**महाराष्ट्र शासन**

क्र.संकीर्ण -११११ /(प्र.क्र.१५१/१५) /समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ७ नोव्हेंबर, २०१५.

४०५० २०/११/१५

प्रति,

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.

आवक ४९४० २०/११/

विषय :- दि.२६ नोव्हेंबर हा दिवस " संविधान दिवस " साजरा करण्याबाबत.
संदर्भ :- सामान्य प्रशासन विभागाचा दि.२४.११.२००८ चा शासन निर्णय.

महोदय,

उपरोक्त विषयावरील श्री.ई.झेड.खोबरागडे, भा.प्र.से. (नि.) यांचे दि.१६.१०.२०१५ चे पत्र कृपया पहावे. (प्रत सोबत जोडली आहे.)

२. राज्यामध्ये संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व जनतेला संविधानाची ओळख व्हावी या दृष्टीने दरवर्षी दि.२६ नोव्हेंबर हा दिवस " संविधान दिवस " म्हणून राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद तसेच राज्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयामध्ये साजरा करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.२४.११.२००८ (प्रत सोबत जोडली आहे.) अन्वये सविस्तर सूचना देण्यात आलेलया आहेत. याबाबत श्री.खोब्रागडे, यांनी त्यांचे दि.१६.१०.२०१५ च्या निवेदनामध्ये " संविधान दिवस " योग्यप्रकारे साजरा करण्याबाबत विनंती केली आहे. तरी सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि.२४.११.२००८ मध्ये नमूद केल्यानूसार उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व शासकीय / निमशासकीय / अनुदानित / कायमविनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये / परिसंस्थांमध्ये " संविधान दिवस " साजरा करण्यात यावा, ही विनंती.

आपली विश्वासू,
का.रा.पिळणकर ७-११-१५
( का.रा.पिळणकर )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सहपत्र : वरील प्रमाणे

सौ. परनाडे

करण्याबाबत संविधान दिवस.doc

२०१९/९५/समन्वय
२८-१०-१५

Sanvidhan FOUNDATION
Founder : E Z Khobragade, IAS(Retd)
Address : 402, Giri-Gaurav Hsg. Society, C-9, Ambazari Hill Top, Ram Nagar, Nagpur - 440 033(Maharashtra)
Email : ez_khobragade@rediffmail.com
Mobile : 09923756900

दिनांक : 16 ऑक्टोबर, 2015.

प्रति,

**मान. नामदार श्री देवेन्द्रजी फडणविस**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**
**मंत्रालय,मुंबई.**

15626
26/10/2015

23 OCT 2015
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
कार्यासन समन्वय
दिनांक 23/10/15
आवक क्र.

**<u>विषय :दिनांक 26 नोव्हेंबर देशभर साजरा होणार- मा.प्रधानमंत्री यांचा निर्णय...</u>**

आदरणीय महोदय,

याविषयी आम्ही आपणास 1 नोव्हेंबर,2014 ला पत्र दिले होते. राज्य शासनाने दिनांक 24 नोव्हेंबर,2008 ला संविधान दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला असला तरी हा दिवस योग्यप्रकारे व विविध कार्यक्रमासह साजरा केला जात नाही. फक्त कार्यालयात 'संविधान प्रास्ताविका' म्हटले जाते. संविधान जनजागृतीसाठी एवढे पुरेसे नाही. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 24 नोव्हेंबर,2008 च्या शासन निर्णयाकडे मी आले लक्ष पुन्हा वेधू इच्छितो.

2. महोदय, माननिय प्रधानमंत्री नरेन्द्रजी मोदी यांनी मुंबई येथे दिनांक 11 ऑक्टोबर 2015 ला, इंदु मिल जागेवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारकाच्या भुमीपुजना नंतर जनतेला संबोधित केले तेव्हा घोषणा केली की, या वर्षापासुन देशभर "26 नोव्हेंबर" ला संविधान दिवस साजरा केला जाईल, सर्व शाळा-महाविद्यालयात संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले जाईल.

3. आपणास माहीतच आहे की, आम्ही सातत्याने यासाठी केंद्र शासनाकडे, प्रधानमंत्री कार्यालयाकडे पाठपुरावा करीत होतो. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे 125 व्या जयंती वर्षानिमित्ताने हा निर्णय मा. प्रधानमंत्री यांनी घेतला. आम्ही या निर्णयाचे स्वागत करून, मा. प्रधानमंत्री यांचे अभिनंदन करीत आहेत. आता देशभर हा संविधान जागृतीचा उपक्रम दिनांक 26 नोव्हेंबर पासुन सुरू होईल.

नस्तीकडे
श्री खोब्रागडे
KRPM
28-10-15

4. मा.प्रधानमंत्री यांच्या या निर्णयाचे अनुषंगाने, आपणास आमची आग्रहाची विनंती आहे की, राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालीका आयुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विद्यापिठाचे कुलगुरू, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिव व अधिकाऱ्यांना निर्देश देवून "26 नोव्हेंबर संविधान दिवस" योग्य प्रकारे व सांस्कृतीक कार्यक्रमासह साजरे करण्याचे कृपया निर्देश द्यावेत. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 24 नोव्हेंबर,2008 व शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 4 फेब्रुवारी 2013 च्या निर्णयातील विविध कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत पासुन मंत्रालय स्तरावरील सर्व कार्यालयात केले जाईल, हयाची दक्षता सामान्य प्रशासन विभागाने घेणेबाबत कृपया निर्देश द्यावेत. महाराष्ट्रातील सर्व कार्यालयात संविधानाची प्रास्तविका 26 नोव्हेंबर ला

दर्शनी भागी लावली जाईल हयाची सुध्दा काळजी घेण्याची आवश्यकता आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या याविषयीचा दिनांक 21 ऑक्टोंबर, 1988 चा शासन निर्णय आहे.

5. महोदय, पुन:श्च याविषयी वरीलप्रमाणे कार्यवाही होणेसाठी आपणास नम्र विनंती आहे. आपले प्रतिसादाच्या प्रतिक्षेत.

आदरपुर्वक !

दिनांक : 16 ऑक्टोंबर, 2015
स्थळ : नागपूर.

आपला नम्र

इ.झेड.खोब्रागडे 16/10/15
भा.प्र.से(नि)

प्रत:

1. मा. नामदार श्री विनोद तावडे, मंत्री शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुबंई.
2. मा. नामदार श्री राजकुमार बडोले, मंत्री सामाजिक न्याय विभाग मंत्रालय,मुबंई.
3. मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन मंत्रालय मुबंई-32.
4. मा.प्रधान सचिव(र व का) मंत्रालय मुबंई-32.
5. मा.प्रधान सचिव,उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय मुबंई-32.
6. मा.प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुबंई-32.

**भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या करीता राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" म्हणून साजरा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक, जपुती २२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२४ नोव्हेंबर, २००८

**प्रस्तावना :-**

भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य व समानता प्राप्त करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताची स्वतंत्र राज्य घटना अंगिकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण केलेली आहे. सदर राज्य घटना ही दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून अंमलात आली तरी भारतीय संविधानाची माहिती अजूनही देशाच्या बहुतेक नागरिकांना तसेच संविधानानुसार काम करणाऱ्या सर्व यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांनाही नाही. त्यामुळे या संविधानाने शासकिय, न्यायीक इत्यादी सारख्या यंत्रणा निर्माण झाल्या त्या संविधानाची ओळख सर्वांना करुन देण्याच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस **"संविधान दिवस"** साजरा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-**

याप्रकरणी शासनाने साकल्याने विचार करुन राज्यामध्ये संविधानाबाबत जनजागृती व्हावी यादृष्टिने **दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस"** म्हणून राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये, पुढीलप्रमाणे साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble) (परिशिष्ट-१ पहावे) सामुहिक वाचन करण्यात यावे.

२) संविधानाबाबत जनजागृती व्हावी म्हणून सर्व शाळा, महाविद्यालयामार्फत त्या दिवशी "संविधान यात्रा" काढण्यात यावी व त्यामध्ये संविधानाची प्रास्ताविका, मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी संचिधानातील महत्वाची कलमे ठळकरित्या दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्स वापरावेत.

३) याबाबत शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध/भित्तीपत्रके/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

४) शासकिय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत संविधानाबाबत जनजागृती करणारी व्याख्याने, कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत इत्यादी.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, उपरोक्त कार्यक्रम साजरा करण्याकरीता येणारा खर्च संबंधीत प्रशासकिय विभागाने/कार्यालयाने हा त्यांच्या कार्यालयीन खर्चातून किंवा अशाच तऱ्हेच्या उद्दिष्टांसाठी असलेल्या तरतूदीतून भागवावा.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात वरील प्रमाणे **"संविधान दिवस"** साजरा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य शासनास दिनांक ५ डिसेंबर पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

टी. एफ. थेक्केकरा

**(टी.एफ.थेन्केकरा)**
**शासनाच्या प्रधान सचिव.**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव/खाजगी सचिव,
मा. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्विय सहाय्यक
मा. मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई,
मा.प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर व औरंगाबाद खंडपिठ.
सर्व मा. अपर मुख्य सचिव, /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय मुंबई,
मा. कुलपती, राज्यातील सर्व विद्यापिठे.
प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई.
सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव, राज्य माहिती आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सचिव, राज्य मानवाधिकार आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग **(सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठवीण्याच्या विनंतीसह).**
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.(आवश्यक ती प्रसिध्दी देण्यासाठी)
सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी **(सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या विभागातील/जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठवीण्याच्या विनंतीसह).**
सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व आयुक्त महानगर पालिका
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
सार्वजनिक बांधकाम विभाग, (प्रशा- ४ ) मंत्रालय मुंबई
निवड नस्ती.

परिशिष्ट-१

# भारताचे संविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम

समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा

व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा

व उपासना यांचे स्वातंत्र्य;

दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

आमच्या संविधानसभेत

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित

करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

-----